**<u>प्रतिवादी क्र.२ सदानंद गणपत तेली उर्फ कुवळेकर यांचा पुढील उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री. एल.एल. नाथगोसावी यांचे मार्फत शपथेवर सुरु .</u>**

२७. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत अ.क्र.३ यास माझ्या सह प्रतिवादी क्र.१ व मूळ वादी यांचे नाव फेरफार क्र.४१३९ अन्वये दि.०९/१०/१९९७ रोजी नोंद करण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की, सदर नोंद करण्याची कारवाई प्रतिवादी यांनी सुरु केली. हे म्हणणे खरे आहे की, सन १९९७ च्या दरम्यान मला उभा धोंडा, मशीदीचे भरड या मिळकतीची माहिती होती. त्या मिळकतींना माझ्या सह माझ्या भावांची नावे नोंद व्हावी याकरिता मी प्रयत्न केला नाही. हक्कसोड पत्रामधील मजकूर मी के.पी. तेली, देवगड यांना सांगितला नव्हता. के.पी. तेली, यांनी मजकूर स्वत:च्या मनाने लिहीलेला नाही. हक्कसोड पत्रामधील मजकूर 'अ.क्र.३ ची मिळकत वडिलोपार्जित व सामाईक आहे' हा खोटा आहे. हक्कसोड पत्रावर सही करण्यापुर्वी त्यातील मजकूर मी वाचला होता. अ.क्र.३ ची मिळकत वडिलोपार्जित व सामाईक मिळकत आहे असे माझ्या वाचनात आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, हक्कसोड पत्रामधील मजकूरा नुसार मोतीराम गणपत कुवळेकर यांनी अ.क्र.३ मधील मिळकतीमध्ये त्यांचा असणारा हक्क आम्हा दोन भावांच्या अधिकारात सोडलेला आहे.

२८. हे म्हणणे खरे आहे की, घर क्र.४४३ हे गणपत याच्या नावे ग्रामपंचायत सदरी कधीही नोंद नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, घर क्र.४४३ हे सुरवातील मोतीराम यांच्या नावे नोंद झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, अ.क्र.१ व २ च्या मिळकती असलेल्या ठिकाणास खांबड असे म्हणतात. साक्षीदार स्वत: कथन करतो की, अ.क्र.१ च्या मिळकती असलेल्या ठिकाणास खांबड असे म्हणतात. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.१ च्या मिळकतीच्या ठिकाणास कापाची घाटी तर अ.क्र.२ च्या मिळकतीच्या ठिकाणास सुरुंगळी असे म्हणतात. हे म्हणणे खरे आहे की, कापाची घाटी या मिळकतीमध्ये जाण्या करिता तावडे, साटम, वाडीये, चव्हाण यांच्या मिळकतीमधून जावे लागतात. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.२ च्या मिळकतीमध्ये जाण्या करिता प्रविण लाड व तावडे यांच्या मिळकती मधून जावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, तावडे व साटम यांची मिळकत रस्त्याला लागून आहे. हे म्हणणे खरे आहे

की, अ.क्र.१ व २ या मिळकतीत जाण्या करिता तावडे, साटम , वाडये , चव्हाण यांच्या मिळकतीमधून पायवाट आहे.

२९. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रामधील परिच्छेद क्र.१५ मध्ये ज्या दोन राहत्या घरांचा उल्लेख केला आहे ती घरे मशीदीचे भरड व उभा धोंडा या मिळकतींमध्ये आहे. हे म्हणणे खरे आहे की, मशीदीचे भरड व उभा धोंडा या मिळकतींमध्ये दोन घरे आहेत.

**मध्यान्हाची वेळ झाल्याने उलटतपास तहकूब......**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

(श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

दि.२०/०१/२०२६

**<u>मध्यान्हानंतर प्रतिवादी क्र.२ सदानंद गणपत तेली उर्फ कुवळेकर यांचा पुढील उलटतपास वादी तर्फे विधीज्ञ श्री. एल.एल. नाथगोसावी यांचे मार्फत शपथेवर सुरु .</u>**

३०. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.१ व २ च्या मिळकतीमध्ये कूळपणाची सुरवात गणपत यांनी केली. गणपत यांनी कूळपणाची सुरवात सन १९७३ मध्ये केली. गणपत हे सन १९७८ साली मयत झाले. हे म्हणणे खरे नाही की, गणपत हयात असताना उभा धोंडा, मशीदीचे भरड या मिळकती मोतिराम यांनी खरेदी केल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की, उभा धोंडा, मशीदीचे भरड या मिळकतीशी गणपत याचा संबंध असल्याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. त्यापैकी एक कागदोपत्री पुरावा न्यायालयात हजर केला आहे. तो कागदोपत्री पुरावा मी वाचलेला नाही. घर क्र.४४३ च्या घरपत्रक उताऱ्यावर बदल करावा याकरिता मी अगर माझा भाऊ रामचंद्र यांनी काही पाठपुरावा केला नाही. हे म्हणणे खरे आहे

की, माझे वडील हयात असताना त्यांच्यावर माझा पूर्ण विश्वास होता. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ च्या मिळकतीचे हक्कसोडपत्र करुन घेण्यापुर्वी सदर मिळकतीमध्ये मोतिराम याचा हक्क आहे याची आम्हाला माहिती होती. प्रस्तुत केस कामी वादीच्या उत्पन्नाची संपूर्ण माहिती मी माझ्या वकिलांना कैफियत देण्यापुर्वी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, ज्या वेळेस माझे वडील मयत झाले त्यावेळेस अ.क्र.१ व २ येथीलच वडिलोपार्जित मिळकती शिल्लक होत्या.

३१. मी गाव मौजे धोपटेवाडी, स.नं.६५ हि.नं.२१ या मिळकतीचा सातबारा उतारा पाहिला आहे. सदर मिळकतीचे मूळ मालक कोण होते याची मला माहिती नाही. सदर मिळकत कोणत्या साली खरेदी घेतली याची मला माहिती नाही. त्या मिळकतीचे क्षेत्र किती होते याची मला माहिती नाही. सदर मिळकत किती रक्कमेला खरेदी घेतली होती याची मला माहिती नाही. मी गाव मौजे चांदोशी, गट नं.८८७ या मिळकतीचा सातबारा उतारा पाहिला आहे. सदर मिळकतीचे मूळ मालक धुरी हे होते. धुरी यांचा गट नं.८८७ या मिळकती मध्ये पाच एकर इतका हिस्सा होता. सदर मिळकत सन १९८७ साली खरेदी घेतली. सदर मिळकतीस अंदाजे सात ते आठ हजार रुपये इतका मोबदला दिला होता. स.नं.६५ हि.नं.२१ व गट नं.८८७ या मिळकती खरेदी करण्या करिता मी व माझा भाऊ यांनी आर्थिक भार उचलला होता हे दर्शविण्याकरिता माझ्याकडे कागदोपत्री पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्थिक भार न उचलल्यामुळे तसा आमच्याकडे पुरावा नाही. हे म्हणणे खरे आहे की, मौजे शिरगाव गावामध्ये गणपत याच्या नावाने कोणताही घरईमला कधीही नव्हता. हे म्हणणे खरे आहे की,आमचे मूळ गाव कुवळे आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमचे पारंपारिक घर व देवस्थान तेथेच आहे. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही दरवर्षी कुवळे या गावी देवदर्शना करिता जात असतो. हे म्हणणे खरे आहे की, कुवळे येथील घरात दरवर्षी गणपती देखील आणला जातो.

३२. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ च्या मिळकतीमध्ये ज्यावेळेस घरईमला बांधला त्यावेळेस अ.क्र.३ ची मिळकत ही केवळ मोतिराम याच्या नावे होती. हे म्हणणे खरे आहे की, सदर घरईमला मोतिराम याचा मुलगा मधुकर याने बांधला होता. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ ची मिळकत ही केवळ मोतिराम याच्या नावे असल्यामुळे मधुकर यास घरईमला

बांधतेवेळेस माझी व भावाची लेखी संमती घेण्याची गरज पडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर घरईमल्यामध्ये वादी आपल्या कुटुंबियासह राहतो. हे म्हणणे खरे नाही की, सदर घरईमल्याच्या सभोवारचे आठ गुंठे क्षेत्र मधुकर याच्या ताब्यात आहे.

प्रश्न – सदर घराच्या परिसरात मधुकर याने लावलेली झाडे आहेत?
उत्तर –केवळ एक माडाचे झाड आहे.

हे म्हणणे खरे आहे की, घर ईमल्याच्या सभोवार एक दगडी कम्पाऊंड आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमची हरकत असणाऱ्या क्षेत्राभोवती सदरचे कम्पाऊंड आहे. हे म्हणणे खरे नाही की, घराच्या डाव्या बाजूने देवस्थानला जाणारी वाट आहे. हे म्हणणे खरे आहे की, मधुकर याच्या घराच्या डाव्या बाजूने एक वाट आहे.

३३. मी परिच्छेद क्र.११ मध्ये नमुद केलेला धनादेश हा सिंधुदुर्ग बँकेचा होता. सदर धनादेशाचा क्रमांक मला लक्षात नाही. सदर धनादेशाचा उल्लेख अ.क्र.३ येथील मिळकतीच्या खरेदी खतामध्ये केला नव्हता. सदर धनादेशाबाबत आणखी कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, अ.क्र.३ च्या मिळकतीच्या खरेदी खतापोटी नारायण चव्हाण यांनी रक्कम रोख स्वरुपात स्विकारली होती. हे म्हणणे खरे नाही की, खरेदी खतातील मजकूरा नुसार सदर रक्कम मोतिराम याने नारायण चव्हाण यांना पोच केली. हे म्हणणे खरे आहे की, खरेदी खतामधील रक्कम मी अगर माझा भाऊ यांनी नारायण चव्हाण यांना पोच केली याबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा आमच्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, आमचे वडील मयत होण्यापुर्वी सहा महिने आजारी होते. हे म्हणणे खरे आहे की, सन १९७७ मध्ये गणपत हे आजारी होते असा कोणताही कागदोपत्री पुरावा आमच्याकडे नाही. हे म्हणणे खरे आहे की, राजाराम हिंदळेकर यांचा मुलगा बाळा हिंदळेकर यांच्याशी माझे संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे आहे की, राजाराम हिंदळेकर यांच्या भुसारी दुकानामध्ये मोतिराम कुवळेकर हे विना मोबदला कामाला होते असा कोणताही कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. मोतिराम कुवळेकर यांच्या लग्नाचे नक्की साल मला सांगता येणार नाही. परंतु ते १९६१ किंवा १९६२ साल असे होते. हे म्हणणे खरे आहे की, मोतिराम यांच्या लग्नाच्या वेळेस माझे वय दहा वर्ष होते तर

रामचंद्र कुवळेकर याचे वय तेरा वर्ष होते. राजाराम यांचा मुलगा बाळकृष्ण यास प्रस्तुत प्रकरणी तपासणार आहे अगर कसे हे मी निश्चीत सांगू शकत नाही. राजाराम हिंदळेकर यांचे भुसारी दुकान होते असा कागदोपत्री पुरावा आम्ही हजर करणार नाही आहोत. आमचे वडील व आई हे मयत होण्यापुर्वी मी व माझा भाऊ त्यांना आर्थिक मदत करत होतो असा कोणताही कागदोपत्री पुरावा न्यायालयात हजर करणार नाही आहोत. साक्षीदार स्वत: कथन करतात की, मेल ट्रान्सफरने पाठविलेल्या पैशाच्या नोंदी पासबुकावर आहे. सदर पासबुक हजर केलेले आहेत. मेल ट्रान्सफरने वडिलांना व आईला पैसे पाठविले अशी एन्ट्री पासबुकमध्ये नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी व माझ्या भावाने आई वडिलांना अशी कोणतीही आर्थिक मदत केली नसल्यामुळे त्याचा कागदोपत्री पुरावा आमच्याकडे नाही.

३४. हे म्हणणे खरे आहे की, मला व माझ्या भावाला वादी यांनी दावा दाखल करण्यापुर्वी वकिलांमार्फत एक नोटीस पाठवली होती. हे म्हणणे खरे नाही की, सदर नोटीसीमध्ये ' आमच्या अशिलाने सन २०१० साली एकमेकांच्या समजुतीने काही सामाईक मिळकती वाटून घेतल्या आहेत, सदर तोंडी वाटपाप्रमाणे नोटीसीत नमुद मिळकत आमच्या अशिलांच्या वाटयास आली त्यास अनुसरुन आपल्या अशिलाने आपल्या नोटीसीत नमुद केल्याप्रमाणे दि.२५/०५/२०१० रोजीचे हक्कसोडपत्र आमच्या अशिलाचे नावे लिहून दिले' असे नमुद केले होते. नोटीसीस दिलेल्या उत्तरावर माझी व भावाची सही आहे. नोटीसीस दिलेल्या उत्तराची माहिती आम्ही आमच्या वकिलांना दिली होती. वकिलांनी उत्तर माहितीस अनुसरुन दिले अगर कसे याची मला माहीती नाही. नोटीसीचे उत्तर वाचून मी त्याची खात्री केली होती. सदर मजकूर चुकीचा आहे असे मला वाटले होते. सदर उत्तर चुकीचे आहे याची माहिती मी माझ्या वकिलांना दिली होती. माहिती चुकीची असून देखील माहिती वकिलांनी स्वत:हून उत्तरात नमुद केली असे घडले नाही. सदर उत्तरामध्ये पान क्र.२ वर 'आपले अशिलांना खरेतर वडिलोपार्जित मिळकतीमधील उत्पन्न वगळता स्वत:चे असे वेगळे असे कोणतेही उत्पन्नाचे साधन नव्हते व नाही' असे नमुद केले होते. मी माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्राच्या परिच्छेद क्र.१० मध्ये 'वादी हे गावी राहत असताना वर नमुद केल्या प्रमाणे त्यांचे स्वत:चे अगर वडिलोपार्जित मिळकतीमधून मिळणारे असे कोणतेही उत्पन्न नव्हते' असे

नमुद केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मला मोतिराम याच्या उत्पन्नाबाबत कोणतीही माहिती नसल्याने नोटीसीमधील व सरतपासातील उत्पन्नाबाबतच्या मजकुरामध्ये फरक दिसून येतो.

३५. हक्कसोडपत्रामध्ये मी व रामचंद्र याने चव्हाण कुटुंबियांकडून मोबदला देऊन मोतिराम याच्या नावे खरेदी घेतली होती असे नमुद करण्यास काही हरकत नव्हती. अशा आशयाचे वाक्य हक्कसोडपत्रात नमुद केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकत मोतिराम याने स्वउत्पन्नातून खरेदी केल्याचे आम्हाला माहीती असल्याने तसे नमुद केले नाही.

**उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब......**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

(श्रीकांत एस. पचंडी )
दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड

दि.२०/०१/२०२६